


## वाढदिवस शुभेच्छा



विजय नवल पाटील
माजी केंद्रीय मंत्री



नंदकिशोर महाजन
जिल्हा उपाध्यक्ष, भाजपा




विनोद तराळ
माफदा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य



सुनील महाजन
अध्यक्ष, लोकेश फाऊंडेशन, पारोळा

मान्यवरांच्या वाढदिवसापूर्वी एक दिवस आधी हितचिंतकांनी खालील ई-मेल आयडीवर संपूर्ण नाव छायाचित्रासह माहिती पाठवावी.
cityjalgaon@gmail.com

## जळगाव गणेश दर्शन



एक गाव एक गणपती मित्र मंडळ, मेहरुण




श्री संत ज्ञानेश्वर चौक, मित्र मंडळ, मेहरुण



जय दुर्गा भवानी क्रीडा मंडळ, मेहरुण



श्री राम तरुण मंडळाचा राजा, मेहरुण



नेताजी चौक, मेहरुण



जयदुर्गा गृप मेहरुण

# कर्तुत्ववान व्यक्तिमत्व नंदकिशोर महाजन

जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष, जिल्हा बँकेचे माजी संचालक, रावेर पंचायत समितीचे माजी सभापती अशा अनेक पदांवर काम करताना ज्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला, असे नंदकिशोर महाजन आहे.त्यांचा लौकिक हा केवळ पदांच्या उंचीवर नव्हे तर समाजातील विविध घटकांना न्याय, हक्क देण्यासाठी लढणाऱ्या कटिबद्ध नेतृत्वावर आहे. सामान्य माणसाच्या प्रश्नांना न्याय मिळवून देणे हेच आपले कर्तव्य मानून त्यांचे कार्य अविरत सुरु आहे.



भारतीय जनता पार्टीचे निष्ठावंत पदाधिकारी म्हणून त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या.परिसरात त्यांनी केलेली विकासकामे ही त्यांची कार्यक्षमता आणि लोकहितैषी दृष्टी याची साक्ष देतात. राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीशभाऊ महाजन, केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे आणि मुक्ताईनगर मतदारसंघाचे कणखर नेतृत्व चंद्रकांत पाटील यांच्या माध्यमातून अनेक प्रश्न मार्गी लावण्यात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. नंदकिशोर महाजन यांच्या नेतृत्वगुणात जिद्द, ध्येयवेडेपणा, लोकसंग्रह आणि कार्यकुशलता यांचा उत्तम संगम दिसून येतो. समाजासाठी कार्य करण्याची त्यांची प्रामाणिक धडपड आणि अढळ निष्ठा हीच त्यांची खरी ताकद आहे. त्यांचा प्रभावी आवाज आणि ठाम भूमिकेमुळेच त्यांनी आपल्या मतदारसंघात तसेच जिल्ह्यात आदराचे स्थान निर्माण केले आहे.आज अशा या बहुआयामी, कर्तृत्ववान व्यक्तिमत्वाचा वाढदिवस आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजात निर्माण झालेली सकारात्मक ऊर्जा आणि प्रेरणा हीच त्यांची खरी ओळख आहे. नंदकिशोर महाजन यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छात्यांना निरोगी आयुष्य लाभो आणि आगामी काळात त्यांच्या मार्गदर्शनातून समाजहिताच्या नवनव्या वाटा खुल्या होवोत, हीच प्रार्थना.

**शब्दांकन- चंद्रकांत विचवे**

# ओबीसी कोट्यातून आरक्षणास विरोध

## अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने आंदोलन

▸▸ जळगाव । प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलन सुरु केले होते. सरकारने मागण्या मान्य केल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले आहे. परंतु, मराठा समाजाला देण्यात येणारे आरक्षण हे ओबीसी समाजाच्या कोट्यातून देऊ नये अशी मागणी पुढे येत आहे. या मागणीसाठी बुधवार ३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या माध्यमातून ओबीसी समाजाने आंदोलन केले. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी ओबीसींच्या जय ज्योती, जय क्रांती अशा घोषणांनी



परिसर दणाणून गेला होता.

ओबीसी समाजाने निवेदनाद्वारे सध्या ओबीसींना अल्प कोट्यातून ३७४ जातींना लाभ मिळतो. त्यात मराठ्यांना सामावल्यास ओबीसींचे आरक्षण नावापुरते उरेल. मराठा समाजाला आरक्षण द्यावे, पण ते ओबीसी कोट्यातून देऊ नये. मराठा समाजाला हवे असल्यास त्यांनी ओबीसींच्या कोट्यात न शिरता न्यायालयीन लढाई लढावी. सरकारने सब-जीआर काढून अन्याय करू नये, या मागण्या केल्या आहेत.

जर मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्याचा निर्णय घेतला तर तीव्र आंदोलन छेडले येईल असा इशारा समता परिषदेतर्फे देण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्त्या निवेदिता ताठे यांनी सांगितले की, आमचे आरक्षण हिसकावून घेतले जाणार असेल, तर आम्हाला आक्रमक व्हावेच लागेल. आम्ही न्यायालयीन लढाई लढतो, तसेच मराठा समाजानेही लढाई लढावी.

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांना निवेदन देतांना संतोष बळीराम माळी, डॉ. सुतिन देतेरे, दीपक पंडीत माळी, संतोष पाटील, राजेंद्र चौधरी, डॉ. एम. बी. सैनी, वसंत पाटील, किशोर सूर्यवंशी, विजय लोहार, विजय वानखेडे, अमोल कोल्हे, रवींद्र माळी, संतोष इंगळे, गोकुळ महाजन, अभिलाषा रोकडे आदींच्या उपस्थित होते.




# शिकाऊ उमेदवारांसाठी भरती मेळाव्याचे आयोजन

**जळगाव ।** सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार, मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र यांच्या मार्गदर्शनाखाली पंतप्रधान राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी योजनेंतर्गत भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सदरचा मेळावा ८ सप्टेंबर, रोजी सकाळी १० वाजता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जळगाव (नॅशनल हायवे क्र. ६, तंत्र निकेतन समोर) येथे होणार आहे. उमेदवारांनी pprenticeshipindia.org या वेबपोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक आहे.विविध व्यवसायातील प्रशिक्षण पूर्ण करून उत्तीर्ण झालेले तसेच दहावी, बारावी, डिप्लोमा आणि डिग्रीधारक प्रशिक्षणार्थी यांना या मेळाव्यात सहभागी होता येणार आहे.

# जैन इरिगेशनच्या खेळाडूंची कॅरम स्पर्धेसाठी निवड







▸▸ जळगाव । प्रतिनिधी

क्रीडा क्षेत्रात जैन इरिगेशनच्या खेळाडूंनी घवघवीत यश मिळवले आहे. आंतरराष्ट्रीय कॅरम स्पर्धेसाठी भारतीय संघात जैन इरिगेशनच्या तीन खेळाडूंची निवड झाली आहे. ही स्पर्धा २ ते ६ डिसेंबर दरम्यान मालदीव येथे होणार आहे. या स्पर्धेत जैन इरिगेशनचे खेळाडू संदीप दिवे, अभिजित त्रिपणकर, झैद फारुकी हे भारतीय संघातून खेळणार आहे. ही निवड आंध्र प्रदेशमधील नेल्लोर येथे फेडरेशन कप या स्पर्धेत व दिल्ली येथे जानेवारी महिन्यात झालेल्या राष्ट्रीय कॅरम अंजिक्यपद स्पर्धेतील कामगिरीवरुन करण्यात आली आहे. ज्यात जैन इरिगेशन कंपनीचे दोन्ही महिला आणि पुरुष संघ हे अंतिम विजेता ठरले होते.

तिघंही कॅरमपटू हे भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. या स्पर्धेत बांगलादेश, पाकिस्तान, श्रीलंका, मालदीव, युरोपियन संघ, अमेरिका, ब्रिटन, स्वित्झर्लंड यासह जगातील प्रमुख देशातील संघ सहभागी होणार आहेत.

या निवडीबद्दल जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, सहव्यवस्थापकीय संचालक अतुल जैन, जैन स्पोर्ट्स अकॅडमीचे अरविंद देशपांडे, रवींद्र धर्माधिकारी, सय्यद मोहसीन यांच्यासह सहकाऱ्यांनी कौतूक केले आहे.

